# आगामी काळात ४० हजार घरांचा ताबा देणार

## पॅराडाईज ग्रुपचे एमडी मनीष भतीजा यांचा विश्वास; ग्राहकांची आलिशान घरांना पसंती

सकाळ वृत्तसेवा

नवी मुंबई, ता. २३ : दोन दशकांहून अधिक काळ ग्राहकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे पॅराडाईज ग्रुप आगामी काळात तब्बल ४० हजार आलिशान घरे निर्माण करणार आहे. नवी मुंबईतच नव्हे, तर एमएमआर क्षेत्रात लक्झरी घरांसाठी पॅराडाईज ग्रुपचे मोठे नाव आहे. ही ओळख ग्राहकांच्या विश्वासामुळे निर्माण झाल्याचे मत ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) मनीष भतीजा यांनी व्यक्त केले. 'टीम सकाळ'ला दिलेल्या मुलाखतीत भतीजा यांनी पॅराडाईज ग्रुपच्या यशाचे श्रेय ग्राहकांना दिले.

मनीष भतीजा यांनी १९९६ मध्ये वयाच्या १६ व्या वर्षी रियल इस्टेट क्षेत्रात पदार्पण केले. भतीजा यांनी पहिल्या प्रकल्पासाठी नवी मुंबईची निवड केली. मूळचे कल्याण येथील रहिवासी असणारे भतीजा यांनी त्यांच्या पहिल्या प्रकल्पाची पनवेलमध्ये मुहूर्तमेढ रोवली, तेव्हा जाहिरातीचे फारसे पर्याय नव्हते. कामाचा दर्जा हेच प्रमाणपत्र घेऊन भतीजा यांनी पॅराडाईज समूहाला बाजारात आणले. आलिशान घरे देतानाच ती सामान्यांच्या आवाक्यात राहतील याचा भतीजा यांचा प्रयत्न असतो. पॅराडाईज ग्रुपने आता ४२ लाखांपासून लक्झरी घरे उपलब्ध केली आहेत. एवढेच नाही, तर या दरांच्या घरासोबत त्यांनी परदेशातील तंत्रज्ञानावर आधारित पायाभूत सुविधाही उपलब्ध केल्या आहेत.

पनवेल परिसरात होत असलेल्या वेगवान विकासाचे भतीजा यांनी पनवेल महापालिकेला श्रेय दिले आहे. महापालिकेतर्फे चांगल्या सुविधा मिळत असल्याने विकसकांना टोलेजंग टॉवर उभे करता येत असल्याचे भतीजा यांनी सांगितले. नवी मुंबई आणि पनवेल परिसरात होत असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ, शिवडी ते न्हावा-शेवा सागरी सेतू, मेट्रो आदी प्रकल्पांमुळे नवी मुंबईत बाहेरून राहायला येणाऱ्या लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. अलीकडे यात २० टक्के वाढ झाली आहे. हे रियल इस्टेट क्षेत्राला उभारी देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पॅराडाईज ग्रुप हा त्यांच्या बांधकामाचा दर्जा आणि वेळेच्या वचनबद्धतेमुळे ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहे. पॅराडाईज ग्रुपकडून मायवन तंत्रज्ञानावर आधारित इमारती उभ्या केल्या जात आहेत. या तंत्रज्ञानामुळे इमारतीचे बांधकाम अधिक मजबूत होत आहे. ते वेळेपेक्षा ४० टक्के लवकर होत आहे, असे भतीजा यांनी सांगितले. आतापर्यंत दहा हजारपेक्षा जास्त घरांचा ग्राहकांना ताबा वेळेवर दिला आहे. १९९६ पासून हे अविरत सुरू आहे. त्यासाठी कंपनीच्या संस्थापकांपासून प्रत्येक घटकाच्या कामामुळे हे घडल्याचे भतीजा यांनी अभिमानाने सांगितले. पॅराडाईज ग्रुपने कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन, कायदेशीर बाबी तपासून, आर्थिक जोखीम पत्करून गृहप्रकल्प उभारले आहेत. सध्या ४० हजार घरांचे बांधकाम सुरू असून दहा वर्षांत ४० हजारपेक्षा जास्त घरांचा ताबा देऊ, असा दृढनिश्चय त्यांनी केला आहे.



मनीष भतीजा

### प्रकल्पांची गगनभरारी

वेळेनुसार केलेला बदल हा तुम्हाला अटीतटीच्या स्पर्धेत टिकवून ठेवतो. हेच गमक ओळखून पॅराडाईज ग्रुप प्रगतीच्या शिखरावर पोहोचला आहे. भारतातील नागरिकांना परदेशातील राहणीमानाबाबत कुतूहल आहे. परदेशातील प्रवास, वास्तव्य आणि पायाभूत सुविधांबाबत भारतीय कमालीचे उत्सुक असतात. पॅराडाईज ग्रुपने ग्राहकांच्या मनातील ही बाब ओळखून त्यांच्याकरिता साई वर्ल्ड सिटी, साई वर्ल्ड एम्पायर, साई सनसिटी, साई वर्ल्ड लीजण्ड आणि साई वर्ल्ड रिट्रिट असे आलिशान घरांचे आणि अद्ययावत पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असणारे प्रकल्प लॉंच केले आहेत.

### सहा हजार घरांचा खारघरमध्ये प्रकल्प

अप्पर खारघर येथे २७ एकरमध्ये असणारा सहा हजार घरांचा साई सनसिटी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ४२ लाखांमध्ये घरासोबत दक्षिण अफ्रिकेतील केपटाऊन येथील सुविधा मिळणार आहेत.